**मुख्य कार्यालय**
**विरार (प)**
**ता. वसई, जि. पालघर**
**पिन कोड - ४०१३०३**

आज़ादी का अमृत महोत्सव

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी :०२५०-२५२५१०५/०६/२५२९८८८/२५२९८९०
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई- मेल :vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. :- व.वि.श.म./वृ.प्रा-उद्यान/४६८/२६-२७
दिनांक :- १८/६/२०२६

## अभिरुची स्वारस्य (Expression of Interest - EOI) सूचना

वसई -विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधील ३१ उद्यानांमध्ये अभिव्यक्ती स्वारस्य अंतर्गत उद्यान परिसरात परिवहनच्या जुन्या बसेसचे रूपांतर करून उपाहारगृह व सार्वजनिक शौचालय उभारणे, चालविणे व देखभाल करणे हे काम महसूल विभागणी तत्वावर देण्यात येणार आहे.याकरिता अनुभवी, पात्र व इच्छुक संस्था/व्यक्तींकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

**महत्वाची अट** : निविदाकाराने उपाहारगृह व शौचालयाच्या व्यवसायातून प्राप्त होणाऱ्या एकूण मासिक महसुलापैकी संस्थेस देऊ केलेली महसूल विभागणीची टक्केवारी (%) निविदेमध्ये स्पष्ट नमूद करावी. सर्व पात्र निविदांपैकी सर्वाधिक महसूल विभागणी (%) देणाऱ्या निविदाकारास इतर अटींची पूर्तता केल्यास प्राधान्य देण्यात येईल

**कामाचे स्वरूप** :

1. परिवहन बसांचे उपाहारगृह व शौचालयात रूपांतर.
2. उपाहारगृह व शौचालयाचे संचालन व देखभाल.
3. परिसराची स्वच्छता व सौंदर्य राखणे.
4. करारातील अटींनुसार महसूल वाटा संस्थेस अदा करणे.
5. महानगरपालिकेला महसूल वाटा :-अर्जदाराने:लखोटा क्र. २ मध्ये कामाचे नाव व महानगरपालिकेला महसूल वाटा म्हणून कॅफेटेरिया + स्वच्छतागृहाच्या एकूण उत्पन्नाच्या [____]% देण्यात येणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख करावा.

| **कामाचे नाव** | **महसुलापैकी संस्थेस देऊ केलेली महसूल विभागणीची टक्केवारी (%)** |
|---|---|
| **शहरातील उद्यानाकरिता नादुरुस्त असलेली बस वाहने यांची दुरुस्ती करून त्यांचे नुतनीकरण करून शौचालय व उपहारगृह बनविणेकामी महसूल/उत्पन्न विभागणी व p.p.p तत्वावर करणेबाबत.** | |

6.अर्जदाराने डिजिटल बिलिंग प्रणाली, मासिक विक्री अहवालठेवणे आवश्यक असून महानगरपालिकेला लेखापरीक्षणाचा अधिकार राहील.

7. सलग 3 महिने असमाधानकारक अहवाल आल्यास करार रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

8. करार समाप्तीनंतर रूपांतरित बसेस व साहित्य महानगरपालिकेच्या मालकीचे राहील.

9. सदर प्रकल्पाचा एकूण कालावधी १५ वर्ष असून लॉक-इन कालावधी 3 वर्षांचा असेल .

10. लॉक-इन कालावधी पूर्वी करार सोडल्यास सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल.

**Pri-bid:-** तारीख : **२३/०६/२०२६**

निविदा सादर करण्याची अंतिम तारीख : **२९/०६/२०२६ वेळ ४.०० वाजेपर्यंत**. निविदा उघडण्याची तारीख : **३०/०६/२०२६**

**अधिक माहितीसाठी संपर्क** : उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग,५ वा मजला,मुख्यालय,वसई-विरार शहर महानगरपालिका.

सदर कामी विस्तृत माहिती आणि सविस्तर अटी व शर्ती www.vvcmc.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(स्वाती देशपांडे)**
**उप-आयुक्त तथा वृक्षअधिकारी**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

**अभिरुची प्रस्ताव (Expression of Interest - EOI) सूचना**

**नादुरुस्त बसेसचे पुनर्वापर (Upcycling) करून कॅफेटेरिया व स्वच्छतागृहामध्ये रूपांतर व संचालनासाठी अभिरुची प्रस्ताव आमंत्रित**

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना उत्तम नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेकडील भंगार अवस्थेतील बसेसचे पुनर्वापर करून त्यांचे **आधुनिक कॅफेटेरिया व स्वच्छतागृह सुविधेमध्ये रूपांतर करणे व त्याचे संचालन करणे** यासाठी इच्छुक संस्था/एजन्सी/कंपनी/स्वयंसेवी संस्था/अनुभवी व्यक्तींकडून अभिरुची प्रस्ताव (EOI) मागविण्यात येत आहेत.

**1. कामाचा संक्षिप्त तपशील**

इच्छुक अर्जदाराने महानगरपालिकेकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या १७ भंगार बसेसची:

- संपूर्ण दुरुस्ती,आवश्यक फॅब्रिकेशन,अंतर्गत व बाह्य रूपांतरण,सुरक्षित स्थिरीकरण,करून त्यांचे **कॅफेटेरिया (Cafeteria)** व **स्वच्छतागृह (Public Toilet Facility)** मध्ये रूपांतर करावे.सदर संपूर्ण काम अर्जदाराने **स्वखर्चाने** करावयाचेआहे.

**2. कामाची व्याप्ती व तांत्रिक अटी**

**2.1 भंगार बस रूपांतर**

- महानगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या बसेसचे पूर्ण रूपांतर अर्जदाराने स्वखर्चाने करावे.
- बसची रचना सुरक्षित, टिकाऊ व नागरिकांसाठी वापरण्यायोग्य असावी.
- सर्व बसेस कायमस्वरूपी स्थिर करणे आवश्यक राहील.
- इंजिन, चेसिस व इतर भाग सुरक्षित पद्धतीने लॉक/डिसेबल करणे आवश्यक राहील.
- बस पुन्हा हलवता येणार नाही.

**2.2 कॅफेटेरिया सुविधा**

- स्वयंपाक व्यवस्था,बैठक व्यवस्था,वीज व्यवस्था,पाणी व्यवस्था,अग्निसुरक्षा व्यवस्था,असणे आवश्यक असून ती **FSSAI मानकांनुसार** असावी.

**2.3 स्वच्छतागृह सुविधा**

- महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र युनिट,पाणी व्यवस्था,ड्रेनेज व्यवस्था,नियमित स्वच्छता व्यवस्था,असणे आवश्यक राहील.

**2.4 मंजुरी**

- सर्व:डिझाईन,लेआउट,आराखडा,महानगरपालिकेच्या उद्यान विभाग विभागाकडून लेखी मंजूर करून घेणे बंधनकारक राहील.

**2.5 आवश्यक परवानग्या**

- अर्जदाराने स्वतःच्या खर्चाने परवानग्या प्राप्त कराव्यात:RTO डी-कमिशन NOC,अग्निशमन विभाग NOC,FSSAI परवाना,आरोग्य विभाग NOC,इतर आवश्यक शासकीय परवानग्या.

**3. संचालन व देखभाल अटी**

- कॅफेटेरिया व स्वच्छतागृहाची:दैनंदिन स्वच्छता,देखभाल,दुरुस्ती,वीज बिल,पाणी बिल,अर्जदाराने भरावे.
- कॅफेटेरियामध्ये:CCTV कॅमेरा,अग्निशामक यंत्रणा,बंधनकारक राहील.

**4. उत्पन्न मॉडेल व आर्थिक अटी**

**अ) कॅफेटेरिया**

- खाद्यपदार्थ विक्री,दर महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार असतील.
- मद्य व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस पूर्ण प्रतिबंध राहील.

**ब) स्वच्छतागृह शुल्क**

- वापर शुल्क कमाल रु. [____] प्रति व्यक्ती,लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना मोफत सुविधा.

**क) जाहिरात**

- बसच्या बाह्य भागावर जाहिरात करण्यास परवानगी.
- डिझाईन महानगरपालिकेच्या मंजुरीनंतरच.

**ड) उद्यान प्रवेश**

उद्यानामध्ये नागरिकांसाठी प्रवेश विनामूल्य राहील.

**5. महानगरपालिकेला महसूल वाटा**

**अर्जदाराने:लखोटा क्र. २ मध्ये कामाचे नाव व महानगरपालिकेला महसूल वाटा म्हणून कॅफेटेरिया + स्वच्छतागृहाच्या एकूण उत्पन्नाच्या [____]% देण्यात येणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख करावा.**

- अर्जदाराने डिजिटल बिलिंग प्रणाली, मासिक विक्री अहवालठेवणे आवश्यक असून महानगरपालिकेला लेखापरीक्षणाचा अधिकार राहील.

**6. दंडात्मक अटी**

- अस्वच्छ कॅफेटेरिया/स्वच्छतागृह
- रु.1000/- प्रतिदिन
- सलग 3 महिने असमाधानकारक अहवाल आल्यास करार रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
- करार समाप्तीनंतर रूपांतरित बसेस व साहित्य महानगरपालिकेच्या मालकीचे राहील.
- लॉक-इन कालावधी 3 वर्षांपूर्वी करार सोडल्यास कामगिरी सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल